# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.02.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर
2. स्कील इंडिया योजनेसाठी 2026 पर्यंत मुदतवाढ देण्याचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय
3. अमेरिकेत ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा दिलासा, सिएटलच्या न्यायालयाचा डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाला अनिश्चित काळासाठी स्थगिती
4. दिल्ली विधानसभेच्या मतमोजणीचे प्राथमिक कल हाती येण्यास सुरुवात आणि
5. मुंबईत सुरू असलेल्या टेनिस स्पर्धेत माया राजेश्वरचा उपांत्य फेरीत प्रवेश

**पीएम मोदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यात, सोमवारपासून फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांसोबतची धोरणात्मक, आर्थिक आणि तांत्रिक भागीदारी आणखी बळकट करणं यावर त्यांच्या या दौऱ्यात मुख्य भर असणार आहे. राजनैतिकदृष्ट्या हा दौरा महत्त्वाचा मानला जात आहे. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉ यांच्या आमंत्रणावरून पंतप्रधान 10 ते 12 फेब्रुवारी दरम्यान फ्रान्सला भेट देणार आहेत. पॅरिसमध्ये आयोजित एआय कृती शिखर परिषदेत ते सह-अध्यक्ष या नात्याने सहभागी होणार असून मोदींच्या फ्रान्स भेटीतील हा सर्वात प्रमुख कार्यक्रम आहे. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या व्यवस्थापनाचं भविष्य या विषयावर जागतिक नेते चर्चा करणार आहेत. एआयचा नैतिक विकास, उपलब्धता, आणि त्यामधील नवोन्मेष अशा अन्य पैलूंवरही या परिषदेत चर्चा होणार आहे. मोदींच्या या दौऱ्यात ते फ्रान्सच्या नेतृत्वाशी संरक्षण, व्यापार, ऊर्जा सहकार्य इत्यादी मुद्द्यांवर तसंच द्विपक्षीय संबंध आणखी दृढ करण्यासंदर्भात चर्चा करतील. तसंच मार्सेली इथं सुरू होत असलेल्या भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाच्या उद्घाटन समारंभालाही ते हजेरी लावणार आहेत. फ्रान्सची भेट आटोपून 12 फेब्रुवारीला ते अमेरिकेला रवाना होतील. डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर काही आठवड्यातच पंतप्रधान या देशाला भेट देत असल्यानं, त्यांचा अमेरिका दौराही फ्रान्सइतकाच महत्त्वाचा मानला जात आहे.

**केंद्रीय मंत्रिमंडळ**

कौशल्य विकासाला चालना देण्याच्या उद्देशानं राबवण्यात येणारी स्किल इंडिया योजना 2026 पर्यंत सुरू ठेवण्याला केंद्रीय मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे. या योजनेसाठी 2022-23 ते 2025-26 या वर्षाकरता केंद्रानं आठ हजार 800 कोटी रुपये मंजूर केले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत प्रसार माध्यमांना ही माहिती दिली. मागणीवर आधारित कौशल्य विकासावर केंद्र सरकारनं लक्ष केंद्रित केलं असून गुणवत्ता वाढीवर भर दिला जाणार असल्याचं वैष्णव म्हणाले. स्वच्छता कर्मचाऱ्यांसाठीच्या राष्ट्रीय आयोगाचा कार्यकाळ 31 मार्च 2028पर्यंत वाढवण्यासही केंद्रानं मान्यता दिली आहे. स्वच्छता कामगारांच्या सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी, त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि स्वच्छतेच्या कामात सुधारणा करण्यासाठी या निर्णयाचा फायदा होईल असं वैष्णव म्हणाले.

**पोस्को सुधारणा चर्चा**

राज्यसभेत काल लैंगिक गुन्ह्यांमध्ये मुलांच्या संरक्षण सुधारणा विधेयक म्हणजेच पॉक्सो कायद्यात सुधारणांसाठी खासगी सदस्य विधेयक विचारार्थ आणि मंजुरीसाठी सादर करण्यात आलं. त्यावर सभागृहात सर्वसमावेशक चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार डॉ. फौजिया खान यांनी हे विधेयक मांडले. अमली पदार्थांचे सेवन, डिजीटल शोषण आणि बालगुन्ह्यांच्या वाढत्या घटना नोंदवल्या जात असून, पॉक्सोच्या नोंदणीकृत प्रकरणांच्या संख्येत गेल्या सहा वर्षात 94 पूर्णांक

47 टक्के वाढ झाल्याचं राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागानं स्पष्ट केलं आहे. नोंदणीकृत प्रकरणांची संख्या तीन लाखापर्यंत पोचली असल्याचंही खान यांनी नमूदत केलं. या कायद्यामध्ये पीडीत केंद्रीय सुधारणा आणून, या वाढत्या आव्हानाला तोंड देण्याचा विधेयकाचा उद्देश आहे. भाजपचे डॉ. राधा मोहन दास अग्रवाल यांनी चर्चेत सहभागी होताना सरकारनं या संदर्भात 2015 पासून 900 एक खिडकी केंद्रं सुरू केल्याचं सांगितलं. तर काँग्रेसचे खासदार जयराम रमेश यांनी पोर्नोग्राफीशी मुलांचा संपर्क रोखण्यासाठी कायदेविषयक बदल करण्याची गरज असल्याचं नमूद केलं.

तत्पुर्वी, सभागृहात कृत्रिम बुद्धिमत्ता विधेयक 2023 सादर झालं. कामाच्या ठिकाणी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि अंमलबजावणी संदर्भात कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि वापराचे नियमन यासाठी हे विधेयक मांडण्यात आलं. तसंच डीपफेक प्रतिबंध आणि गुन्हेगारीकरण विधेयकही सादर करण्यात आलं.

**<u>लोकसभा</u>**

लोकसभेत काल केंद्रीय अर्थसंकल्पावरच्या चर्चेला सुरुवात झाली. हा अर्थसंकल्प देशातील कृषीविषयक आव्हानांना तोंड देण्यात अपयशी ठरला आहे, अशी टीका काँग्रेसचे धर्मवीर गांधी यांनी केली. तर भाजपाचे राव राजेंद्र सिंह यांनी केंद्रीय अर्थसंकल्प हा गरीब, शेतकरी आणि महिलांचं हित जपणार असल्याचं म्हणत त्याचं कौतुक केलं. यानंतर लोकसभेचं कामकाज सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<u>रिझर्व्ह बँक पतधोरण</u>**

सुमारे पाच वर्षांनंतर भारतीय रिझर्व्ह बँकेनं रेपो दरात 25 शतांश टक्क्यांची कपात केली आहे. काल जाहीर केलेल्या द्वैमासिक पतधोरणात बँकेनं आधीचा साडेसहा टक्के रेपो दर कमी करुन सव्वासहा टक्के करण्याचा निर्णय जाहीर केला. महागाई कमी झाली आहे आणि 2025-26 या आर्थिक वर्षात ती आणखी कमी होण्याची अपेक्षा असल्यामुळे रेपो दर कपातीचा निर्णय घेतल्याचं बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी सांगितलं. यंदाच्या आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक वृद्धी दर 6 पूर्णांक 4 दशांश टक्के राहण्याची शक्यता बँकेनं व्यक्त केली आहे.

**<u>दिल्ली मतमोजणी</u>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला सुरूवात झाली आहे. आता प्राथमिक कल हाती येण्यास सुरुवात झाली आहे. दिल्लीत 11 जिल्ह्यांमध्ये 19 मतमोजणी केंद्र उभारण्यात आली आहे. दिल्ली विधानसभेसाठी पाच तारखेला 60 पूर्णांक 54 टक्के मतदान झालं होतं.

दरम्यान, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचं पथक काल, आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय समन्वयक अरविंद केजरीवाल यांच्या घरी पोचलं असता त्यांना घरी प्रवेश करू दिला नाही. केजरीवाल यांनी आपच्या उमेदवारांना भाजपनं लाच दिल्याचा आरोपांच्या चौकशीसाठी विभाग गेला होता.

**<u>अमित शहा-अमली पदार्थ</u>**

मुंबईत मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थांचा मोठा साठा जप्त केल्याप्रकरणी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईच्या अमली पदार्थ नियंत्रण विभागाचं अभिनंदन केलं आहे. मुंबईत काल उच्चप्रतीचे कोकेन, गांजा आणि भांगेच्या गोळ्या जप्त करण्यात आलं तसंच या संदर्भात चार लोकांना अटकही करण्यात आली. समाज माध्यमांवर लिहिलेल्या संदेशात शहा यांनी अमली पदार्थ मुक्त भारत साकारण्यासाठी सखोल तपासाच्या दृष्टीकोनाच्या यशाचं हे द्योतक असल्याचं म्हटलं आहे. कोणत्याही सहिष्णूतेशिवाय कायद्याचं कठोर पालन करून अमली पदार्थांच्या व्यापार नेस्तनाबूत करणार असल्याचं म्हटलं आहे.

**<u>अमेरिका ग्रीनकार्ड</u>**

अमेरिकेत राहाणाऱ्या आणि ग्रीन कार्डच्या प्रतीक्षेत असलेल्या भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सिएटलमधील न्यायाधीशांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याच्या कार्यकारी आदेशाला

अनिश्चित काळासाठी स्थगित केलं आहे. संविधानासंदर्भात धोरणात्मक डावपेच खेळण्यासाठी कायद्याला डावलण्याचा प्रयत्न असल्याची टीका न्यायालयानं ट्रम्प यांच्या आदेशासंदर्भात बोलताना केली आहे. यापुर्वी मेरीलँडच्या न्यालयानंही अशाच प्रकारचा निर्णय दिला आहे. संविधानाशी धोरणात्मक डावपेच खेळले जाऊ शकत नसल्याचं नमूद करून जन्मसिद्ध नागरिकत्वाच्या नियमात बदल कऱण्यासाठी संविधानात सुधारणा करण्याची गरज असल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे.

**बांगलादेशी अटक**

मार्च 2020 पासून बेकायदेशीररीत्या देशात रहात असलेल्या सात बांगलादेशी नागरिकांना काल मुंबईत अटक करण्यात आली. यामध्ये चार महिलांचा समावेश आहे. अटक करण्यात आलेले सातही जण गेल्या पाच वर्षांपासून मुंबईतल्या चेंबूरच्या माहुल भागात रहात होते, त्यांच्याकडे कोणतीही वैध कागदपत्रं नव्हती. तसंच त्यांनी बांगलादेशी असल्याचं कबूल केलं आहे, अशी माहिती आरसीएफ पोलीस स्थानकातील अधिकाऱ्यांनी दिली.

**ढाका उच्चायुक्त**

ढाकाच्या उच्चायुक्तांनी केलेल्या नकारात्मक विधानांसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं बांग्लादेशाच्या उच्चायुक्तांना बोलावून घेऊन भारतानं त्यांना समज दिली. या संदर्भात बांग्लादेशच्या अधिकाऱ्यांनी वारंवार भारताचं नकारात्मक चित्रण करणारी वक्तव्ये करणे खेदजनक असल्याचं मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जायस्वाल यांनी म्हटलं आहे. भारत बांगलादेशबरोबर सकारात्मक, रचनात्मक आणि परस्पर फायदेशीर संबंध इच्छितो, ज्याची अलिकडच्या उच्चस्तरीय बैठकांमध्ये अनेक वेळा पुनरावृत्ती झाली असल्याचं रणधीर यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितले.

**उत्तराखंड राष्ट्रीय खेळ**

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या फुटबॉल, मुष्टीयुद्ध आणि तिरंदाजी खेळांमध्ये काल विविध मणिपूर, आसाम आणि महाराष्ट्र या राज्यांनी चमकदार कामगिरीचे प्रदर्शन केलं. महिला मुष्टियुद्धात महाराष्ट्राच्या दिव्या पवारनं 45 किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावलं. तर उत्तराखंडच्या निवेदिता कार्कीनं लाईट फ्लायवेट प्रकारात सुवर्ण पदक मिळवलं. महिलांच्या सांघिक टेनिसच्या अंतिम फेरीत, महाराष्ट्राने गुजरातवर विजय मिळवत सुवर्णपदक जिंकले, तर पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत, तामिळनाडूने कर्नाटकला हरवून अव्वल स्थान पटकावले. पुरूषांच्या फुटबॉलच्या अंतिम सामन्यात केरळने उत्तराखंडचा पराभव करत सुवर्ण पदकाला गवसणी घातली.

**टेनिस**

मुंबईत सुरू असलेल्या एल अँड टी टेनिस स्पर्धेत, माया राजेश्वरन महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत पोचली आहे. पंधरा वर्षीय मायाने  उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या मेई यामागुची हिचा 6-4, 3-6, 6-2 असा पराभव केला. भारताची एकमेव खेळाडू असलेल्या मायाची आज उपांत्य फेरीत स्वित्झर्लंडच्या खेळाडूशी लढत होणार आहे. महिला दुहेरीत प्रार्थना ठोंबरे आणि अरिनी हार्टोनो यांनी एडन सिल्वा आणि अनास्टिएशिया टिखोनोव्हा यांचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली आहे.

# या बरोबरच हे बातमीपत्र संपलं

# नमस्कार.